आर्थिक वर्ष २०१९-२० महानिर्मितीच्या भुसावळ १x६६० मे.वॅ. प्रकल्पासाठी भागभांडवल समायोजनाने वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. निधिवि-२०१९/प्र.क.८२ (भुसावळ)/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -: ०९ ऑक्टोंबर, २०१९

संदर्भ :-१. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/उर्जा-४ दि.५.१०.२०१०
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दि. ०१.०४.२०१९
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि. ०८.०७.२०१९
४. महानिर्मितीचे पत्र क्र.CMD/MSPGCL/No. ९२२५, दि. २७.०८.२०१९

प्रस्तावना :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने भुसावळ औष्णिक बदली प्रकल्पाच्या रु. ४२९० कोटी पैकी शासनाचे २०% भागभांडवल रु. ८५८ कोटी इतके मंजूर केले आहे. त्यापैकी आजतागायत रु. ८६.५५०१ कोटी भागभांडवल महानिर्मिती कंपनीस वितरीत करण्यात आले आहे.

२. महानिर्मिती कंपनीचा सदर प्रकल्पासाठी जुलै, २०१९ अखेर सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकंदरीत रु. १५९.७३ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर झालेल्या खर्चाच्या २०% भागभांडवलाची रक्कम रु. ३१.९५ कोटी महानिर्मिती कंपनीस रोखीने वितरीत न करता रु.३१.९५ कोटी महानिर्मिती कंपनीकडून शासनास (जलसंपदा विभागास) येणे असलेल्या भाडेपट्टीपोटी पुस्तकी समायोजनाने वितरीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये राज्य शासनाची भांडवली गुंतवणुक म्हणून रु.३१,९५,००,०००/- (रु.एकतीस कोटी पंच्यानऊ लाख फक्त) इतकी रक्कम पुस्तकी समायोजनेद्वारे वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली भागभांडवलाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबीचा खर्च "मागणी क्र.के-११ मुख्यलेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०२ ओष्णिक विद्युत निर्मिती,१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका,पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०३) भुसावळ ओष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणुक (४८०१३७३१)५४ गुंतणुक" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधुन समायोजित करण्यात यावा.

४. वरील मंजूर झालेल्या भागभांडवलाची संपुर्ण रक्कम महाराष्ट्र राज्य निर्मिती कंपनी मर्यादीत यांना रोख न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महानिर्मिती कंपनीकडून जलसंपदा विभागास देय असलेल्या भाडेपट्टीच्या रकमेपोटी वसूल करण्यात यावी आणि खाली नमूद केलेल्या जमा लेखाशिर्षाखाली समायोजनेद्वारे जमा करण्यात यावी

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये | जमा लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १ | वितीय वर्ष २०१९-२० या वित्तीय वर्षातील भाडेपट्टी समायोजित करावयाची रक्कम | ३१,९५,००,०००/- | ०८०१ वीज २२(०१) इतर जमा रक्कमा महाराष्ट्र राज्य वीज मंडळांकडून मिळणारी भाडेपट्टीची रक्कम (०८०१०१६३) |
| | एकूण | ३१,९५,००,०००/- | |

५. सदर रकमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल मुंबई यांचे अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रकमेचे देयक तयार करण्यात येवू नये.

६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र -१ यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात रु.३१,९५,००,०००/- (रु.एकतीस कोटी पंच्यानऊ लाख फक्त) चे पुस्तकी समायोजन करून शासनास तसे कळवावे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९१००९१२२०२४१२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ना. रा. ढाणे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
३) उप सचिव, जलसंपदा विभाग (लक्षवेध श्री. ज्ञा. आ. बागडे), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
५) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१०) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
११) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१२) मुख्य अभियंता (विद्युत) जल विद्युत प्रकल्प यांचे कार्यालय, एच.एस.बी.सी इमारत, ४ था मजला, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई ४००००१
१३) अवर सचिव (ऊर्जा-४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१४) निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई .३२